# प्रकरण – 15 (मॅन्युअल – 14)

## <u>कामे पार पाडण्यासाठी आखून दिलेल्या प्रमाणपध्दती/नियम</u>

15.1 कृपया खात्यामार्फत आखून दिलेली विविध कामे/कार्यक्रम पार पाडण्यासाठी दिलेल्या प्रमाणपध्दती/नियम याबाबतची माहिति पुरविण्यात यावी.

1) **विकास नियंत्रण नियमावली 33(7) आणि 33(9) अन्वये महानगरपालिका भाडेकरु असलेल्या मालमत्तेच्या पुनर्विकासाबाबत**.

विकास नियंत्रण नियमावली 33(7) आणि 33(9) ची धोरणात्मक मार्गदर्शक तत्वे विचारात घेऊन ह्या खात्याकडून समिती अहवाल तयार केला जातो, नंतर कामाचे मुख्य असलेल्या अतिरिक्त मुंबई महानगरपालिका आयुक्तांच्या तांत्रिक समितीमध्ये सदर विषयाची चर्चा केली जाते. समितीचे इतर सदस्य सह आयुक्त (सुधार), संचालक (अभि.सेवा व प्रकल्प), प्रमुख अभियंता (विकास नियोजन), उप प्रमुख अभियंता (खा.प्रा.कक्ष), कायदा अधिकारी आणि सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) हे आहेत. नंतर प्रकल्पांशी संबंधित सवलती लक्षात घेऊन एकत्रित निर्णय घेतला जातो. नंतर महानगरपालिका आयुक्तांची मंजुरी घेतली जाते. समितीच्या सभेमध्ये जो निर्णय घेतला जातो त्याप्रमाणे सुधार समिती/महानगरपालिका हयांच्या मंजुरीकरीता मसुदापत्र सादर केले जाते.